माझा हेतू फक्त गावातल्या लोकांची सेवा!....

'लोकांना नेहमीच्या आजारांवर वेळेवर, कमी पैशात व योग्य औषधोपचार मिळण्यासाठी गावातल्या एका स्त्रीला आजारांचे व औषधोपचारांचे प्रशिक्षण देऊन तिला 'गाव आरोग्य सखी /कार्यकर्ती' म्हणून तयार करणे.' ही संकल्पना तशी महाराष्ट्रात नवीन नाही. या संकल्पनेला धरून वेगवेगळी प्रयोग केले गेले. याच धर्तीवर महाराष्ट्रातल्या कर्जत, सोलापूर आणि वाशिम या जिल्ह्यातल्या एकूण मिळून ५० गावांमध्ये हा उपक्रम राबवला. या सगळयामध्ये औषधाची पेटी मिळाल्यानंतर गाव आरोग्य सखींना आलेले अनुभव इथं माडत आहे-

'औषधपेटी मिळाल्याच्या दुस-या दिवशी सासरे खड्ड्यात पडले. मी विसरूनच गेले की माझ्याकडं ड्रेसिंगचं सामान आहे म्हणून. जखमेतून भळाभळा वाहणारं रक्त बघून मी ताबडतोब डॉक्टरांना बोलावलं. पण डॉक्टर घरी यायला तयार होईनात. मग मला ट्रेनिंगमध्ये शिकवलेलं आठवलं आणि लगेचच मी डोक्याची जखम दाबून धरली. भाऊंनी शिकवतांना हेही सांगितलं होत की 'चेह-यावर आणि डोक्याकडे रक्त जास्त वाहत असतं.' म्हणूनच एवढं रक्त वाहायला लागलं. मग पेटीमध्ये काय मिळतयं का? ते बघावं म्हटलं. तर ड्रेसिगंच सामान होतंच. लगेच पट्टी केली. रक्त थांबलं. पण सासरे माझं कसलं ऐकत्यात. त्यांच्या समाधानासाठी डॉक्टरांकडे गेलो. तेव्हा 'पट्टी व्यवस्थित केली आहे. परत करायची गरज नाही.' डॉक्टर असं म्हटल्यावर लई भारी वाटलं. मी आपल्या घरच्यांच्या उपयोगी पडल्याचं समाधान मिळालं....

'पेटी आल्यावर आमच्या भावकीत चर्चा सुरु झाली. काय उपयोग या गोळ्यांचा? काहीतरी करत बसायच उगाचच? गोळ्यांनी काय झालं तर कोण निस्तरणार? माझ्या पोरानी भावकीतले लोक काय बोलले ते मला येऊन सांगितलं. ऐकल्यावर पहिल्यादी लई वाईट वाटलं. वाटलं कशाला करावा हा उपद्व्याप? असा विचार मनात चालू होता तवाच माझ्याकडं पहिला पेंशट आला. सर्दी खोकल्याचा मग प्रशिक्षणात जे काही घेतलं होत ते आठवलं आणि त्याप्रमाणे पेशंटला नक्की काय झालं आहे. ते सांगितले. सी. पी. एम. ची गोळया देऊन घरगुती उपचारही सांगितले. जरा धाकधुक होत होती. पेशंटला गोळया दिल्यावर 'कसं वाटतयं' हे सांगायला दुस-या दिवशी परत बोलावलं? पेशंट पण 'बरं वाटतयं' हे सांगायला आवर्जून सांगायला आला. मग मनात विचार आला "आपण काल काय विचार करत होतो. आणि आपल्यामुळे या पेशंटचा डॉक्टरांकडे जायचा वेळ, पैसा, दगदग वाचली आणि गावातच उपचार मिळाला. आपण असंच काम करत राहावं त्यामुळे लोकात आपलं नाव निघतयं आणि लोकांना सेवा पण मिळते. पण लोक विचित्र बोलत्यात ते मनात होतच.. हळूहळू लोकांना समजंलच की...

"आमच्या गावात उपकेंद्र आणि दोन प्रायव्हेट डॉक्टरही पण आहेत. पेटी मिळाल्याचं तिथल्या डॉक्टरांना कळल्यावर मला त्यांनी बोलवून घेतलं. मी पण मिळालेली पेटी घेऊनच गेले आणि त्यांना प्रशिक्षणाबद्दल सगळं सांगितलं. डॉक्टरांना सगळं चांगलं वाटलं. डॉक्टर एवढंही म्हणाले, 'बरं झालं ताई! मला तुमचा नक्की उपयोग होईल. आपल्या गावातलं मेडीकलचं दुकान लांब आहे. तुला औषधांची चांगली माहिती आहे. आता यापुढे मी माझे पेंशट औषधासाठी तुझ्याकडे पाठविन.' मी काहीच बोलले नाही. पण मनात म्हटलं "आपण जरी काम एकसारखं करत असलो तरी तुमचा हेतू पैसे कमावण्याचा आणि माझा हेतू फक्त गावातल्या लोकांची सेवा. आपलं काय जुळायचं नाही. नंतर तुम्हीच मला वैतागाल तुमचे पेशंट कमी झाल्यावर ....."

"औषधपेटी मिळाल्यावर त्यादिवशी माझा नवराच आजारी पडला पण अजिबात म्हणाला नाही मला औषधं दे म्हणून. माहित नव्हतं आणि मुख्य म्हणजे विश्वास नव्हता. त्यादिवशी एक पेशंट आली. तिला प्रश्न विचारून आणि तपासणी करून 'रक्तपांढरी' असं मी निदान केलं. तिला ह्या आजाराबद्दल सरकारी दवाखान्यातल्या लोहाच्या गोळ्या घेण्याबद्दल आणि खाण्यापिण्याबद्दल नीट समजावून सांगितलं नवरा सगळं ऐकत होता. त्याला कुठतरी वाटलं की आपल्या बायकोला काहीतरी येत असलं. मग थोड्या वेळाने मला म्हणाला गावभर औषधे देणार आहेस पण घरच्याकडे बघणार की नाही. मी पण लगेचच म्हणाले, 'अवं मी देणारच होते तुम्हांला औषधं. पण पेशंटनी काय होत ते जर सांगितलं पाहिजे ना आणि औषधासाठी पैसे लागत्यात. मी तुम्हांला तपासीन पण उधार खातं नाही चालणार. बघा परवडतयं का? आणि हो, मी अगदी कमी पैशात तुम्हाला बरं करीन पण रोख व्यवहार आहे माझ्याकडे'. माझा नवरा पण शहाणा तो थोडीच एकतोय तो म्हणाला, 'आधी उपचार कर.... बरं वाटलं तर पैसे देईन नाहीतर नायं'. मी म्हटलं 'डॉक्टरला असचं म्हणता का? देता ना सांगेल तेवढे पैसे. मग मला पण द्यावं लागतील आणि आमाला सगळं लिहून दिलयं आम्ही तेवढचं पैसे घेणार तुम्हाला लुबाडणार नाही'. मग कुठे बाबा तयार झाला आणि दुस-या दिवशी ठणठणीत पण झाला. पैसे पण लगेच दिले. मला लई भारी वाटलं नव-यानं मला स्वतःहून पैसे काढून दिले. न मागता....

“मी आशा होतेच. पण आता सखी म्हणून काम करते. लोक आधी म्हणायचे, ‘तु नुसती नावाची आशा. तुला काय बी येत नाही. लई लाज वाटायची. माझं सरकारी ट्रेनिंग झालयं. आणि औषधंपेटी मिळणार आहे असं कळलं होतं. पण या मिळालेल्या पेटीमुळं मला काम करायला लई आधार मिळाला. पण ही पेटी मिळल्यावर लोकं म्हणायला लागले की, तू तर सरकारी आणि सरकारी फुकट औषधांचे पैसे कसले घेतेस, पण हे असं होणार याचा मी आधीच विचार केला होता. मग माझ्याकडं येणा-या प्रत्येक पेशंटला सरकारी ट्रेनिंग आणि या आरोग्यसखीच्या प्रशिक्षणमधला फरक नीट समजावून सांगितला. या पेटीमधल्या औषधांबद्दल आणि त्यांच्या किमतींचा आम्हांला मिळालेला तक्ताच दाखवते. आता लोक जास्त काही विचारत नाही. औषध घेऊन जातात. हा आता काही उधारी आहे पण तेवढं चालायचंच पण जर सरकारच्या भरवशावर राहिले असते तर लोकांची अजून बोलणी खावी लागली असती. आणि सेवा तर बाजूलाच राहिली असती.....

माझ्या नव-याच्या अलिकडे नेहमी पोटात दुखवायचं त्याला वाटायचं जतं झाले आहेत. मी प्रशिक्षणामध्ये पोटदुखी शिकले होते. त्यांचं पोट तपासल्यानंतर त्यांनी सांगितली लक्षणं, राहणीमान म्हणजे वेळीअवेळी जेवण, मसालेदार पदार्थ खाणं यासगळ्यातून मला त्यांचं कुपथ्यामुळं पोट दुखत आहे. त्यांना हे सांगितल्यावर ‘चार प्रशिक्षण नाही केली की लागली मला शिकवायला’ असं म्हणाले. माझं काही ऐकायला तयार नाही. मग ठरवलं की डॉक्टराकडं जावं. डॉक्टरांनी सगळं ऐकून घेतल्यावर तेही मी सांगितलं त्याप्रमाणेच म्हणाले, ‘या ताई बरोबर सागंत आहेत. त्यांचं निदान अगदी बरोबर आहे’. आणि डॉक्टरांनी काही औषधं लिहून दिली. माझा नव-याला तेव्हा कुठे विश्वास वाटला की आपल्या बायकोला काहीतरी येतय म्हणून. पण डॉक्टरांनी यावेळेस त्यांची फी जरा जास्तच घेतली. त्यांना कळलं असलं आता या घरचं सगळेजण पुन्हा आपल्याकडे येणार नाहीत. आता आले आहेत तर कशाला सोडा कापा त्याला...

आरोग्य सखींचे हे अनुभव ऐकून मी तर थक्क झालो. एका महिन्यात त्यांच्या अनुभवाच्या शिदोरीत किती भर पडली आहे. अनुभवांची ही शिदोरी आरोग्य सखींना आणि आम्हांलाही कामाची उर्मी देणारी आहे. त्यांनी ांगितलेले हे अनुभव म्हणजे आम्ही घेतलेल्या प्रशिक्षणाची, कष्टाची पावतीच मिळाल्यासारखी वाटली.

डॉ. नितीन जाधव.